अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठी घरकुल योजनेची अंमलबजावणी करणेबाबत.........

**महाराष्ट्र शासन**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,

शासन निर्णय क्रमांक : बीसीएच -२००९/प्र.क्र.१५९/मावक-२

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक :- २ डिसेंबर, २०१०.

वाचा:-
१. शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक बीसीएच -२००८/प्र.क्र.३६/मावक-२, दि.१५.११.२००८
२. शासन निर्णय,गृहनिर्माण विभाग क्र.रागांयो-९९/प्र.क्र.१८०/गृनियो-१ दिनांक २१.०८.२००९
३. शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्र.इंआयो-२००९/प्र.क.१५३/योजना-१०, दिनांक ३१.८.२००९
४. शासन निर्णय,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.बीसीएच-२००९/प्र.क्र.१५९/मावक-२, दि.९.३.२०१०
५. शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्र.इंआयो-२०१०/प्र.क्र.३४/योजना-१०, दि.९.४.२०१०
६. शासन पुरक पत्र, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.बीसीएच-२००९/प्र.क्र.१५९/मावक-२, दि.६.८.२०१०

**शासन निर्णय** - सामाजिक न्याय विभागामार्फत अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठी घरकुल योजना राबविण्यास अनु.क्र.१ वरील दिनांक १५/११/२००८ शासन निर्णय अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. सदर योजनेच्या अंमलबजावणी संदर्भात अनु.क्र.४ वरिल दिनांक ९ मार्च २०१० च्या आदेशान्वये काही सुचना दिल्या आहेत. सदर आदेशातील सुचनांबाबत शासन पूरक पत्र क्र.बीसीएच-२००९/प्र.क्र.१५९/मावक-२, दि.६.८.२०१० अन्वये काही परिच्छेदांबाबत स्पष्टीकरण देण्यात आले आहे. सदर पूरकपत्र या आदेशान्वये अधिक्रमीत करण्यात येत असून अनुसुचित जाती व नवबौध्द घटकांसाठीच्या घरकूल योजनांच्या अंमलबजावणी संदर्भात पुढील प्रमाणे सुचना देण्यात येत आहेत:-

१) ग्राम विकास विभागाने इंदिरा आवास योजना राबवितांना पात्र लाभार्थ्यांची यादी तयार केली आहे. सदर यादीतील मागासवर्गीय लाभार्थ्यांना घरकुल योजनेअंतर्गत प्रथम प्राधान्य देण्यात यावे.

२) सदर घरकूल योजनेत गावाची निवड करताना ग्राम विकास विभागाने इंदिरा आवास योजने प्रमाणे गावे निवड करण्याची पध्दत अनुसरावी.

३) घरकूल योजना ही संपूर्णपणे ग्राम विकास विभागाच्या नियंत्रणाखालील जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत राबविण्याचे ठरले असल्याने, योजनेअंतर्गत गाववार पात्र लाभार्थ्यांना रक्कम अदा करतांना यापुढे विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांच्या सहस्वाक्षरीची गरज असणार नाही.

२. हे आदेश ग्राम विकास व जलसंधारण विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत असून हे महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आले असून त्याचा संगणक क्र.२०१०१२०२२१४४१४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशनुसार व नांवाने,

(उ. शि. लोणारे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा.राज्यपाल यांचे कार्यालय
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा.उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री, सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री,सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव
सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
प्रधान सचिव (वित्त) वित्त विभाग यांचे स्वीय सहाय्यक
प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांचे स्वीय सहाय्यक
प्रधान सचिव(ग्रामविकास) ग्रामविकास व जलसंधारण विभाग,यांचे स्वीय सहाय्यक
सचिव,गृहनिर्माण,यांचे स्वीय सहाय्यक
महानगर आयुक्त,मुंबई महानगर प्रादेशिक क्षेत्रविकास प्राधिकरण,बांद्रा कुर्ला संकुल,मुंबई
संचालक,नगरपालिका प्रशासन,वरळी,मुंबई
उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण,वांद्रे(पू.)मुंबई.
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
वित्त विभाग (व्यय-१४/अर्थोपाय) मंत्रालय, मुंबई
सर्व विभागीय समाज कल्याण अधिकारी
सर्व विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी
सर्व समाज कल्याण अधिकारी, गट-अ.जि.प.
आयुक्त,सर्व महानगर आयुक्त
मुख्याधिकारी, सर्व नगरपालिका/नगरपरिषद
सर्व मंत्रालयीन विभाग,
महालेखापाल,महाराष्ट्र-१, मुंबई

----------